## APPENDIX-II


### गर्भजल परीक्षा करण्यास महाराष्ट्राची बंदी

### शंकरराव चव्हाणांची घोषणा

मुंबई ता. ३१ - राज्यातील खाजगी इस्पितळातून गर्भजल परीक्षा करण्यावर बंदी घालण्याचा निर्णय आज महाराष्ट्र सरकारने घेतला. मंत्रिमंडळाच्या साप्ताहिक बैठकीनंतर मुख्यमंत्री शंकरराव चव्हाण यांनी पत्रकारांशी बोलताना ही घोषणा केली. या निर्घृण पध्दतीला बंदी घालणारे महाराष्ट्र हे देशातील पहिलेच राज्य आहे.

नववर्षाच्या पूर्वसंध्येस पत्रकारांशी बोलताना श्री. चव्हाण म्हणाले," सरकारी इस्पितळे, स्थानिक स्वराज्य संस्थांची इस्पितळे, इंडियन कौन्सिल ऑफ मेडिकल रीसर्च यासारख्या संशोधन संस्था आणि सरकारचे खास परवानगी दिलेले दवाखाने यांच्यामधूनच फक्त गर्भजल परीक्षेला परवानगी दिली जाईल. अशा संस्थांमधूनही गर्भवती महिला ३५ वर्षांपेक्षा अधिक वयाची असेल आणि अगोदर व्यंग किंवा विकृती असणारे अपत्य झाले असेल अशावेळीच फक्त गर्भजल परीक्षा करण्यास परवानगी दिली जाईल. तसेच अशा गर्भजल परीक्षा करण्यापूर्वी रुग्णालयात आवश्यक प्रशिक्षित कर्मचारी,आवश्यक साधनसामग्री असली पाहिजे असे बंधन घालण्यात आले आहे.

- A news item from Daily 'Sakal' on 1st January, 1988; regarding ban on pre-identification of male or female child.



SARR. BALASAHEB KHARDEKAR LIBRARY
SHIVAJI UNIVERSITY, KOLHAPUR

## कुटुंब नियोजनाचा त्रिकोण बदलण्याचा निर्णय

पुणे, ता. २७ - कुटुंब नियोजनाची गेल्या अनेक वर्षांत सर्वांना माहिती झालेली लाल त्रिकोणाची खूण बदलण्यात आली असून, कुटुंब कल्याणाची व्यापक कल्पना समाविष्ट होईल अशा स्वरूपाच्या त्रिकोणाची खूण वापरण्यास सुरूवात झाली आहे.

वाढत्या लोकसंख्येवर आळा घालण्यासाठी स्त्री-पुरूषांवर शस्त्रक्रिया, लोकसंख्या, नियंत्रणाची साधने यावर भर असणारा कुटुंब नियोजन कार्यक्रम देशभर राबविण्यात आला. गेल्या अकरक वर्षांपासून ` कुटुंब नियोजन ` या ऐवजी ` कुटुंब कल्याण ` हा कार्यक्रम स्वीकारण्यात आला. या कार्यक्रमावर कुटुंब नियोजनाच्या आधीच्या कार्यक्रमाखेरीज प्रसूती-पूर्व काळजी, माता-बाल संगोपन, बालक आरोग्याचे कार्यक्रम यांचाही समावेश करण्यात आला. नव्या व्यापक कार्यक्रमाची खूण म्हणून मात्र जुना लाल त्रिकोणच वापरण्यात येत होता.

गेल्या काही दिवसांपासून ही खूण बदलण्यात आली आहे. नवी खूण त्रिकोणाची असून त्यात पिवळा, काळा आणि लाल असे तीन रंग वापरले आहेत. त्रिकोणाच्या खालच्या कोपऱ्यात लाल त्रिकोण, त्यावर काळ्या रंगात लहान मुलगी आणि त्यावर पिवळ्या पार्श्वभूमीवर पांढऱ्या रंगात पती-पत्नी आणि सुखी संसाराचे चिन्ह असणारे फूल असे चित्र आहे.

नवा त्रिकोण सरकारी वाहनांवर कचेऱ्यावर तसेच कुटुंब कल्याण खात्याच्या कागदपत्रांवर फायलींवर दिसू लागला आहे. तथापि सार्वत्रिक स्वरूपात त्याचीलोकांना माहिती व्हावी या करिता राज्यातील एक लाख

तीस हजार ट्रक्स आणि तेवढ्याच संख्येची टॅक्सी, रिक्षा आदि वाहने यांच्यावर हे चिन्ह रंगविले अथवा चिकटविण्यात येईल. त्यासाठी परिवहन खात्याने सहकार्य देऊ केले आहे.

नव्या खुणेचा आशय एक मुलगी असणारे ही ` कुटुंब सुखी असते ` हे लोकांच्या मनावर ठसविणे हा आहे. दोन मुली असणारे कुटुंब आणि मुलगा व मुलगी असणारे कुटुंब या प्रकारच्या बदललेल्या खुणांची भित्तिपत्रके गावोगावी लावली जातील. एकच मुलगा किंवा दोन मुली असणारे छोटे कुटुंब सुखी असते हे लोकांना मुद्दाम सांगणे गरजेचे राहिलेले नाही.

- A news item from Daily 'Sakal', Kolhapur, March 28, 1988, p.5.